# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:14.01.2025** **वार:मंगळवार**

---

1. भारतीय हवामान विभागाच्या 150 व्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार मिशन मौसम योजनेचा प्रारंभ
2. संक्रांतीच्या पुण्यपर्वाच्या पार्श्वभूमीवर, उत्तरप्रदेशतील प्रयागराज त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळ्यात अमृतस्नान
3. देशभरात आज संक्रांत, पोंगल, बिहू सणांचा उत्साह
4. देशात प्रत्यक्ष कर संकलनात 16 टक्क्यांची वाढ, चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत 16 लाख 90 हजार कोटी रुपयांच उत्पन्न आणि
5. नवी दिल्लीत आजपासून भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला सुरुवात

**मिशन मौसम**

भारतीय हवामान विभागाच्या 150 व्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आज मिशन मौसम या योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. हवामानाबाबत माहिती देणारी अत्याधुनिक यंत्रणा निर्माण करण्याच्या उद्देशानं ही योजना तयार करण्यात आली आहे. अत्याधुनिक रडार यंत्रणा, उपग्रह यांच्या माध्यमातून हवामानाबाबतची अचूक निरीक्षणं याद्वारे मिळू शकतील. हवामान बदलाच्या आव्हानांना समोरं जाण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या IMD व्हिजन-2047चं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. त्यात हवामानाचा अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामान बदल कमी करण्याच्या योजनांचा समावेश आहे.

**पंतप्रधान-मुंबई दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते मुंबईतल्या नौदलाच्या गोदीत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी राष्ट्राला अर्पण करण्यात येणार आहेत. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका एकाचवेळी नौदलात सामील होणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहन मंदिराचं उद्घाटनही होणार आहे.

**महाकुंभ मेळा**

जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक उत्सव म्हणून गणल्या गेलेल्या महाकुंभ मेळ्याला उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं कालपासून पौष पौर्णिमेच्या मुहूर्तावर सुरुवात झाली. आज मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात पहिला अमृत स्नानाचा मुहूर्त असून, आज पहाटेपासून विविध साधू आखड्याच्या संत महंतांनी शाही स्नान करून या पर्वणीला सुरुवात केली. एकंदर 13 आखाडयाचे प्रमुख संत महंत आणि त्यांचा परिवारातील साधूंनी त्रिवेणी संगमावर हे स्नान केल. सर्वप्रथम स्नान करण्याचा मान महानिर्वाणी पंचायतनी आखाडयाला मिळाला तर शेवटच शाही स्नान पंचयातनी निर्मल आखाडयाने केल.

तत्पूर्वी लाखों भाविकांच्या गर्दीत हर हर महादेव आणि हर हर गंगे च्या जयघोषात संन्यासी, उदासीन, जुना आखाडा अक्षय विविध आखाडयांच्या मिरवणुका काढण्यात आल्या आणि सर्व साधू परिवार शाही स्नानासाठी संगम

घाटावर दाखल झाला. साधूनच्या शाही स्नानानंतर भविकांच्या पवित्र स्नानाला सुरवात झाली असून ही स्नान पर्वणी आज दिवसभर सुरू राहणार आहे. दरम्यान काल पौष पौर्णिमेच्या मुहूर्तावर सुमारे दीड कोटी भाविकांनी काल गंगा यमुना सरस्वतीच्या या पवित्र संगमावर पवित्र स्नान केल.

144 वर्षानी आलेला हा दुर्मिळ महाकुंभ मेळाचा योग 26 फेब्रुवारी पर्यन्त म्हणजेच महाशिवरात्री पर्यन्त सुरू राहणार आहे. हा महकुंभमेळा जगातला सर्वांत मोठा सांस्कृतिक आणि धार्मिक मेळावा असून, भारतीय आध्यात्मिक पंरपरेचा विराट उत्सव आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाज मध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>संक्रांत शुभेच्छा</u>**

मकरसंक्रांतीचं पर्व कालपासून देशभरात उत्साहान सुरु झालं असून देशाच्या विविध भागात विविध नावांनी हा सुगीचा उत्सव साजरा केला जातो. पंजाब, हरयाणा आणि उत्तर भारतात लोहडी, ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू, महाराष्ट्र आणि तेलंगणात भोगी म्हणून साजरा केला जातो. काल नवी दिल्लीत नाराइना इथ आयोजित लोहडीच्या उत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहभाग घेऊन उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

राज्यात संक्रांतीनिमित्त खरेदीचा उत्साह दिसत आहे. तीळ गूळ हलव्याचे दागिने, तसंच विविध आकारांचे रंगीबेरंगी पतंग अशा वस्तूंनी बाजार फुलले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज साजऱ्या होत असलेल्या मकर संक्रांत, पोंगल, माघ बिहू या सणानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<u>सोयाबीन खरेदी</u>**

सरकारनं आतापर्यंत जवळपास 13 लाख 68 हजार क्विंटल सोयाबीनची किमान आधारभूत किंमतीनं खरेदी केली असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली. महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीची मुदत 31 जानेवारीपर्यंत तर राजस्थानात 4 फेब्रुवारीपर्यंत वाढवण्यात आली असल्याचंही चौहान यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितलं. राज्य सरकारांनी केलेल्या मागणीनुसार खरेदीची मुदत वाढवण्यात आल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सातत्यानं काम करत असल्याचं सांगत शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किंमतीत दर्जेदार कीटकनाशकं उपलब्ध होतील याची खबरदारी घ्यावी असं आवाहनही त्यांनी राज्य सरकारांना केलं.

**<u>प्रत्यक्षकर संकलन</u>**

देशात चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर संकलनात 16 टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली असून तो सुमारे 16 लाख 90 हजार कोटी रुपये इतका झाला आहे. तसच केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या अहवालानुसार देशात सकल प्रत्यक्ष कर संकलनातही 20 टक्क्यांची वाढ झाली असून तो आतापर्यंत 20 लाख कोटीच्या वर संकलित झाला आहे. मागील आर्थिक वर्षात तो या काळात 17 लाख कोटी इतका होता. या सकल प्रत्यक्ष कर संकलनात कॉर्पोरेटकर क्षेत्राचा वाटा 10 लाख कोटी तर इतर क्षेत्रांचा वाटा 11 लाख कोटी इतका आहे.

**<u>परीक्षा लांबणीवर</u>**

राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं उद्या म्हणजे 15 जानेवारीला नियोजित असलेली युजीसी नेट परीक्षा पुढं ढकलली असून परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे. पोंगल, मकर संक्रांत या आणि इतर सणांमुळे ही परीक्षा लांबणीवर टाकण्याची मागणी करण्यात येत होती, ती मागणी विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असल्याचं एनटीएनं निवेदनाद्वारे कळवलं आहे.

**जयशंकर-माद्रिद**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल माद्रिद इथं त्यांचे स्पेनचे समपदस्थ खोसे मानुएल आल्बारेस यांची भेट घेतली. आल्बारेस यांच्याशी व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, शहरी विकास, रेल्वे अशा विविध क्षेत्रातील द्विपक्षीय भागीदारीबाबत फलदायी चर्चा झाल्याचं डॉ. जयशंकर यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. भारत आणि युरोपीय महासंघ संबंध अधिक बळकट करण्यामधला महत्त्वाचा घटक आणि भूमध्य प्रदेशातील विश्वासू भागीदार म्हणून भारताला स्पेनचं कौतुक असल्याचंही त्यांनी पुढे म्हटलं आहे. उभय देशांनी क्रीडा आणि शाश्वत शहरी विकास संबंधीचे दोन करार केले असल्याचंही जयशंकर यांनी नमूद केलं आहे.

**सिंगापूर**

भारत आणि सिंगापूर दरम्यानच्या द्विपक्षीय धोरणात्मक संबंधाना 60 वर्ष पूर्ण होत असून, या पार्श्वभूमीवर सिंगापूरचे राष्ट्रपती थरमन षणमुग रत्नम हे आजपासून पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्याबरोबर एक उच्च स्तरीय शिष्टमंडळही येत आहे. या दौऱ्यात राष्ट्रपती थरमन षणमुग रत्नम हे राष्ट्रपती द्रौपदी मुरमू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. तसच 17 आणि 18 जानेवारीला ते ओडिशा राज्याच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**बॅडमिंटन**

भारतीय खुल्या सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धा आजपासून नवीदिल्लीत सुरू होत आहेत. यामध्ये भारताच्या 36 ऑलिंपिकपटूसह जगातल्या विविध देशांचे 200 खेळाडू यामध्ये सहभागी होत आहेत, पॅरिस ऑलिंपिक 2024 नंतर बऱ्याच कालावधीनंतर भारताची अव्वल बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधु या स्पर्धेत सहभागी होत असून तिचा आज पहिला महिला एकेरीचा सामना ताइवानच्या सुंग शुओ युन हिच्याशी होणार आहे.

**खो-खो विश्वचषक**

भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या सहकार्याने भारतीय खो-खो महासंघातर्फे आयोजित खो-खो विश्वचषक स्पर्धेला काल नवी दिल्लीत इंदिरा गांधी इनडोअर मैदानावर सुरुवात झाली. 19 जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत 20 पुरुष आणि 19 महिला संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात भारतीय पुरुष संघानं काल नेपाळवर 42-37 अशी मात करत विजयी सलामी दिली. भारतीय महिला संघाचा पहिला सामना आज दक्षिण कोरियाच्या संघाशी होणार आहे. दरम्यान, या स्पर्धेसाठी विशेष बाब महणून महाराष्ट्र सरकारनं दहा कोटी रुपयांचा निधी दिला आहे. भारताच्या पुरुष संघाचं नेतृत्व प्रतीक वायकर करत असून प्रियांका इंगळे ही महिला संघाची कर्णधार आहे. या विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना 19 जानेवारी रोजी होणार आहे.

**याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार**